गोवादूत : पणजी – मंगळवार, दि. ३१ मार्च २०१५

# तथाकथित विकासासाठी दिला जातोय जंगलांचा बळी

## डॉ. मधुकर बाचूळकर यांनी दोडामार्ग येथे व्यक्त केली खंत

**दोडामार्ग, दि. ३० (प्रतिनिधी)**

विकासाच्या नावाखाली अमाप जंगल तोड, नैसर्गिक अधिवास नष्ट केले जात आहेत. पर्यावरणातील प्रत्येक घटक हा मानवी उत्क्रांतीसाठी महत्त्वपूर्ण असतो. म्हणून त्यांचे संवर्धन करणे ही प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे. असे प्रतिपादन विजयसिंह यादव महाविद्यालयाचे प्राचार्य व माधव गाडगीळ समितीचे सदस्य डॉ. मधुकर बाचूळकर यांनी केले. दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात 'पश्चिम घाट – जागतिक वारसा : पर्यावरण आणि विकास' या विषयावर आयोजित केलेल्या दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोप समारंभात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. आर.बी. पाटील हे होते.


डॉ. मधुकर बाचूळकर

जगाच्या एकूण दोन तृतीयांश जैवविविधता ही केवळ १७ देशांमध्ये उपलब्ध असून, भारत हा त्यातील एक प्रमुख देश आहे. जगातील एकूण वनस्पतींपैकी ७.१टक्के वनस्पती व ६.४ टक्के प्राणी भारतात उपलब्ध आहेत. भारतातील पश्चिम घाटात विविध प्राणी, वनस्पती, आज दुर्मीळ होत चालल्या आहेत. जगातील फक्त २० टक्के जैवविविधतेचा आज पर्यंत शोध लागला आहे तर ८० टक्के जैवविविधता अजूनही विज्ञानाच्या दृष्टिक्षेपात आलेली नाही. पर्यावरण संवर्धनाच्या बाबतीत राज्यकर्ते आणि प्रशासन उदासीन आहे. महाराष्ट्रात फक्त दोन राष्ट्रीय उद्याने, नऊ अभयारण्ये आणि एक व्याघ्र प्रकल्प आहेत. त्याकडेही पाहिजे तेवढे लक्ष दिले जात नाही. लोकांची दिशाभूल करून पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. यासाठी प्रत्येक नागरिकाने जैवविविधतेचे संवर्धन केले पाहिजे. ती प्रत्येकाची नैतिक जबाबदारी .

या दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रातील दुसऱ्या दिवशी पश्चिम घाटातील पर्यटन विकास, पर्यटन विकासातील समस्या व पश्चिम घाटातील जल व्यवस्थापन या विषयावर वेगवेगळ्या राज्यातून आलेल्या तज्ज्ञांनी आपले शोध निबंध सादर केले. समारोप समारंभात प्रा. व्ही.ए. पाटील. विवेकानंद नाईक, भाई परमेख, पर्यावरण, संशोधक, अभ्यासक, प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. प्राचार्य डॉ.व्ही.ए. पाटील यांच्या संकल्पनेतून साकारलेले हे चर्चासत्र पूर्णपणे यशस्वी झाल्याचे मनोगत उपस्थितांनी व्यक्त केले. समारोप समारंभाचे सूत्रसंचालन या चर्चासत्राचे सहसमन्वयक प्रा. सोपन जाधव तर चर्चासत्राचे समन्वयक डॉ. पी.डी. गाथाडे यांनी आभार मानले.